पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा समिति

कार्यपत्रिका क्रमांक - ९

**सभावृत्तांत**

दिनांक - ०७/०१/२०१५ वेळ - दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०७/०१/२०१५ रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. ननवरे जितेंद्र बाबा - सभापती**
**२)** मा. तानाजी विठ्ठल खाडे
**३)** मा. लोंढे शुभांगी संतोष
४) मा. सुपे आशा रविंद्र
५) मा. सौ.साळुंके सविता सुरेश
६) मा. गिता सुशिल मंचरकर
७) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
८) मा. बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.नगरसदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१२) महापौर चषक राष्ट्रीय शरीरसौष्टव स्पर्धा २०१५ आयोजित करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१३) महापौर चषक राज्यस्तरीय कयाकिंग आणि कनोईंग (बोटींग) स्पर्धा २०१५ आयोजित करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१४) महापौर चषक जिल्हास्तर हॅंडबॉल स्पर्धा २०१५ आयोजित करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१५) महापौर चषक जिल्हास्तर बॉक्सिंग स्पर्धा २०१५ आयोजित करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१६) महापौर चषक जिल्हास्तर वेट लिफ्टिंग स्पर्धा २०१५ आयोजित करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१७) महापौर चषक जिल्हास्तर बुध्दिबळ स्पर्धा २०१५ आयोजित करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१८) महापौर चषक राज्यस्तरीय हॉलिबॉल स्पर्धा २०१५ आयोजित करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१९) २५ जानेवारी २०१५ रोजी चिंचवड शहरात सुर्यनमस्कार महोत्सवाचे आयोजन करणेबाबत - मा.गिता मंचरकर, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२०) महापौर चषक जिल्हास्तर जलतरण स्पर्धा आयोजनाबाबत - मा.शुभांगी लोंढे, मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२१) खो-खो खेळाच्या महापौर चषक स्पर्धा प्र.क्र.९ संभाजीनगरमध्ये आयोजित करणेबाबत मा.शुभांगी लोंढे, मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२२) मोरया गोसावी क्रिडांगणाची दुरुस्ती करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.गीता मंचरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२३) सांगवी येथील स.नं.८१ व ८२ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान आरक्षण क्र.३३८ बाबत...- मा.गिता मंचरकर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२४) नवी सांगवीतील बॅडमिंटन हॉल चालविण्यास देणेबाबत - मा.गिता मंचरकर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

--------

अ) दिनांक ०३/१२/२०१४ व १७/१२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र. ७)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १७/१२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र. ८)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ४५      विषय क्रमांक - १

दिनांक - ०७/०१/२०१५      विभाग - क्रीडा

सुचक - मा.शुभांगी लोंढे      अनुमोदक - मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/६९१/२०१४, दि.०८/१२/२०१४

विषय - क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/३:२०१३-१४ भोसरी निवास जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजाबाबत....

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४६ विषय क्रमांक - २
दिनांक - ०७/०१/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.गिता मंचरकर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७१३/२०१४, दि.२९/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/१:२०१३-१४ नेहरुनगर जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजासाठी प्राप्त झालेल्या लघुत्तम दरानुसार **मे.वरदायिनी एन्टरप्राईजेस, चिंचवड** यांना नेहरुनगर जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज देणेकामी पहिल्या वर्षात दरमहा र.रु.१,३६,६२०/- प्रमाणे १२ महिन्यांकरिता र.रु.१६,३९,४४०/- इतका व दुस-या वर्षात दरमहा र.रु.१,४८,३३३/- प्रमाणे १२ महिन्यांकरिता र.रु.१७,७९,९९६/- इतका असा एकूण र.रु.३४,१९,४३६/- ( अक्षरी र.रु.चौतीस लाख एकोणीस हजार चारशे छत्तीस फक्त ) चे खर्चास व करारनामा करुन २ वर्षाचे कामाचे आदेश देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४७ विषय क्रमांक - ३
दिनांक - ०७/०१/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.निलेश बारणे अनुमोदक - मा.सुरेश म्हेत्रे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७१४/२०१४, दि.२९/१२/२०१४
विषय - क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/२:२०१३-१४ थेरगाव जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजाबाबत....

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४८ विषय क्रमांक - ४
दिनांक - ०७/०१/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.गिता मंचरकर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७१५/२०१४, दि.२९/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/४:२०१३-१४ चिंचवडगांव जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजासाठी प्राप्त झालेल्या लघुत्तम दरानुसार **मे.वरदायिनी एन्टरप्राईजेस, चिंचवड** यांना

चिंचवडगांव जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज देणेकामी पहिल्या वर्षात दरमहा र.रु.१,१५,१७०/- प्रमाणे १२ महिन्यांकरिता र.रु.१३,८२,०४०/- इतका व दुस-या वर्षात दरमहा र.रु.१,२३,३३३/- प्रमाणे १२ महिन्यांकरिता र.रु.१४,७९,९९६/- इतका असा एकूण र.रु.२८,६२,०३६/- ( अक्षरी र.रु.अठ्ठावीस लाख बासष्ट हजार छत्तीस फक्त ) चे खर्चास व करारनामा करुन २ वर्षाचे कामाचे आदेश देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४९ विषय क्रमांक - ५
दिनांक - ०७/०१/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.शुभांगी लोंढे अनुमोदक - मा.सविता साळुंके
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७१६/२०१४, दि.२९/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/६:२०१३-१४ पिंपळे गुरव जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजासाठी प्राप्त झालेल्या लघुत्तम दरानुसार **मे.सुमित स्पोर्टस् अन्ड फिटनेस इक्विपमेंट्स, चिंचवड** यांना पिंपळे गुरव जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज देणेकामी पहिल्या वर्षात दरमहा र.रु.१,०३,९५०/- प्रमाणे १२ महिन्यांकरिता र.रु.१२,४७,४००/-इतका व दुस-या वर्षात दरमहा र.रु.१,१४,३४५/- प्रमाणे १२ महिन्यांकरिता र.रु.१३,७२,१४०/- इतका असा एकूण र.रु.२६,१९,५४०/- ( अक्षरी र.रु.सव्वीस लाख एकोणीस हजार पाचशे चाळीस फक्त ) चे खर्चास व करारनामा करुन २ वर्षाचे कामाचे आदेश देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५० विषय क्रमांक - ६
दिनांक - ०७/०१/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.गिता मंचरकर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७१८/२०१४, दि.२९/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/८:२०१३-१४ निगडी प्राधिकरण जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजासाठी प्राप्त झालेल्या लघुत्तम दरानुसार **मे.वरदायिनी एन्टरप्राईजेस, चिंचवड** यांना निगडी प्राधिकरण जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज देणेकामी पहिल्या वर्षात दरमहा र.रु.१,१०,८८०/- प्रमाणे १२

महिन्यांकरिता र.रु.१३,३०,५६०/- इतका व दुस-या वर्षात दरमहा र.रु.१,२१,९६८/- प्रमाणे १२ महिन्यांकरिता र.रु.१४,६३,६१६/- इतका असा एकूण र.रु.२७,९४,१७६/- ( अक्षरी र.रु.सत्तावीस लाख चौ-याण्णव हजार एकशे शहात्तर फक्त ) चे खर्चास व करारनामा करुन २ वर्षाचे कामाचे आदेश देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५१ विषय क्रमांक - ७

दिनांक - ०७/०१/२०१५ विभाग - क्रीडा

सुचक - मा.सुरेश म्हेत्रे अनुमोदक - मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७१९/२०१४, दि.२९/१२/२०१४

विषय - क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/९:२०१३-१४ मोहननगर जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजाबाबत.....

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५२ विषय क्रमांक - ८

दिनांक - ०७/०१/२०१५ विभाग - क्रीडा

सुचक - मा.निलेश बारणे अनुमोदक - मा.सविता साळुंके

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७२०/२०१४, दि.२९/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/१०:२०१३-१४ सांगवी जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजासाठी प्राप्त झालेल्या लघुत्तम दरानुसार **मे.वरदायिनी एन्टरप्राईजेस, चिंचवड** यांना सांगवी जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज देणेकामी पहिल्या वर्षात दरमहा र.रु.१,१८,८००/- प्रमाणे १२ महिन्यांकरिता र.रु.१४,२५,६००/- इतका व दुस-या वर्षात दरमहा र.रु.१,३०,०००/- प्रमाणे १२ महिन्यांकरिता र.रु.१५,६०,०००/- इतका असा एकूण र.रु.२९,८५,६००/- ( अक्षरी र.रु.एकोणतीस लाख पंच्याऐंशी हजार सहाशे फक्त ) चे खर्चास व करारनामा करुन २ वर्षाचे कामाचे आदेश देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५३ विषय क्रमांक - ९
दिनांक - ०७/०१/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.निलेश बारणे अनुमोदक - मा.सविता साळुंके
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७२१/२०१४, दि.२९/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/११:२०१३-१४ कासारवाडी जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजासाठी प्राप्त झालेल्या लघुत्तम दरानुसार **मे.वरदायिनी एन्टरप्राईजेस, चिंचवड** यांना कासारवाडी जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज देणेकामी पहिल्या वर्षात दरमहा. र.रु.९७,०२०/- प्रमाणे १२ महिन्यांकरिता र.रु.११,६४,२४०/- इतका व दुस-या वर्षात **मे.ओंकार इंजिनिअरिंग, पिंपरी** यांना दरमहा र.रु.१,०६,७२२/- प्रमाणे १२ महिन्यांकरिता र.रु.१२,८०,६६४/- इतका असा एकूण र.रु.२४,४४,९०४/- ( अक्षरी र.रु.चोवीस लाख चौव्वेचाळीस हजार नऊशे चार फक्त ) चे खर्चास व करारनामा करुन मे.वरदायिनी एन्टरप्राईजेस, चिंचवड व मे.ओंकार इंजिनिअरिंग, पिंपरी यांना प्रत्येकी एक - एक वर्षाचे कामाचे आदेश देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५४ विषय क्रमांक - १०
दिनांक - ०७/०१/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.सुरेश म्हेत्रे अनुमोदक - मा.गिता मंचरकर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७१७/२०१४, दि.२९/१२/२०१४

विषय - क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/७:२०१३-१४ यमुनानगर जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजाबाबत ....

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५५ विषय क्रमांक - ११
दिनांक - ०७/०१/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.शुभांगी लोंढे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७२२/२०१४, दि.३१/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने आंतरशालेय ८ कला व गिर्यारोहण स्पर्धा आयोजित करणेस व त्यानुषंगाने विद्यार्थ्यांना द्यावयाचा खाऊ / बिस्किटे खरेदी, कला पुस्तिका

छपाई, चित्रकला कागद खरेदी, फ्लेक्स बॅनर, ट्रॉफीज, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्र छपाई, इ. खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन खरेदी करणेस तसेच प्रेक्षागृह भाडे, पी.एम.पी.एम.एल.बस भाडे कामी येणा-या अंदाजे र.रु.३,९९,८५०/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदरचा खर्च क्रीडा निधी मधील वार्षिक स्पर्धा, क्रीडा कला या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच चित्रकला, लेझीम व गिर्यारोहण या स्पर्धा अनुषंगाने स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या इ.खर्च स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत स्पीकर, माईक व्यवस्था खर्च विद्युत विभाग संबंधित प्रभागातून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकेड शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ५६ विषय क्रमांक - १२

दिनांक - ०७/०१/२०१५

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.शुभांगी लोंढे

संदर्भ : मा.सविता साळुंके, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने महाराष्ट्र बॉडीबिल्डर्स असो. यांचे मान्यतेने माहे जानेवारी २०१५ मध्ये प्राधिकरण निगडी येथे महापौर चषक राज्यस्तर शरीरसौष्टव स्पर्धा २०१५ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे एकूण र.रु.१५,०५,०००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.१,००,०००/- हा स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा खर्च विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.१३,५५,०००/- क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने ट्रॉफीज, सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे, निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्रे, फ्लेक्स बॅनर, इ. खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५७ विषय क्रमांक - १३

दिनांक - ०७/०१/२०१५

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.शुभांगी लोंढे

संदर्भ : मा.सविता साळुंके, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने महाराष्ट्र राज्य कयाकिंग असोशिएशन, कयाकिंग अन्ड कनोईंग असोशिएशन ऑफ पुणे डिस्ट्रिक्ट यांचे मान्यतेने माहे फेब्रुवारी / मार्च २०१५ मध्ये थेरगांव बोटक्लब, पुणे येथे महापौर चषक राज्यस्तर कयाकिंग आणि कनोईंग (बोटींग) स्पर्धा २०१५ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्च र.रु.१७,७१,४००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष

येणा-या खर्चास मान्यता तसेच स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था, खेळाडूंसाठी गाद्या, उशा, चादरी, बादल्या खर्च र.रु.३,३४,४००/- हा स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत स्पिकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.१,००,०००/- हा खर्च विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.१३,३७,०००/- क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने ट्रॉफीज, सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे, निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्रे, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, टोप्या इ. खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५८ विषय क्रमांक - १४

दिनांक - ०७/०१/२०१५

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.शुभांगी लोंढे

संदर्भ : मा.सविता साळुंके, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने पुणे जिल्हा हॅंड बॉल असोसिएशन यांचे मान्यतेने, पिंपरी चिंचवड शहर हॅंड बॉल असोसिएशन, आकुर्डी पुणे ३५ यांचे सहकार्याने माहे जानेवारी / फेब्रुवारी २०१५ मध्ये आकुर्डी येथील मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दू माध्यमिक विद्यालय मैदान येथे महापौर चषक जिल्हास्तर हॅंड बॉल स्पर्धा २०१५ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्च अंदाजे एकूण र.रु.४,४१,०००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदरच्या खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.१,००,०००/- हा स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.६०,०००/- हा खर्च विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.२,८१,०००/- क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने ट्रॉफीज, सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे, निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्रे, फ्लेक्स बॅनर, इ. खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५९ विषय क्रमांक - १५

दिनांक - ०७/०१/२०१५

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.शुभांगी लोंढे

संदर्भ : मा.सविता साळुंके, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने पुणे जिल्हा बॉक्सिंग असोशिएशन यांचे मान्यतेने व एकता विकास प्रतिष्ठाण, पिंपळे गुरव यांचे सहकार्याने माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये प्रभाग ५६ चिल्ड्रन पार्क, नियोजित उद्यान जागा, सृष्टी चौक, कासारवाडी, पिंपळे गुरव पुलाजवळ, पिंपळे गुरव येथे महापौर चषक जिल्हास्तर बॉक्सिंग स्पर्धा २०१५ आयोजित करणेस व त्याकामी

येणा-या खर्च र.रु.८,८५,०००/- चे खर्चास मान्यता तसेच स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था, गॅलरी खर्च र.रु.२,५०,०००/- हा स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत स्पिकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.५०,०००/- हा खर्च विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.५,८५,०००/- क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने ट्रॉफीज, सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे, निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्रे, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, टोप्या इ. खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६० विषय क्रमांक - १६

दिनांक - ०७/०१/२०१५

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.शुभांगी लोंढे

संदर्भ : मा.सविता साळुंके, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने पुणे जिल्हा वेटलिफ्टिंग असोशिएशन यांचे सहकार्याने माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये प्रभाग क्र.५७ कै.काळूराम जगताप जलतरण तलाव व बॅडमिंटन हॉल परिसर, पिंपळे गुरव, पुणे ६१ येथे महापौर चषक जिल्हास्तर वेटलिफ्टिंग स्पर्धा २०१५ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.३,८३,०००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदर खर्चातील स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था, गॅलरी खर्च र.रु.५०,०००/- हा स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत स्पिकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.२०,०००/- हा खर्च विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.३,१३,०००/- क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने ट्रॉफीज, सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे, निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्रे, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, इ. खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६१ विषय क्रमांक - १७

दिनांक - ०७/०१/२०१५

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.शुभांगी लोंढे

संदर्भ : मा.सविता साळुंके, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने व पिंपरी चिंचवड महानगर चेस असोशिएशन, चिंचवड पुणे ३३ यांचे सहकार्याने माहे फेब्रुवारी/मार्च २०१५ या काळात मनपाचे श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी येथे महापौर चषक जिल्हास्तर बुध्दीबळ स्पर्धा २०१५ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.२,८३,४५०/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-

या खर्चास मान्यता व सदर खर्चातील स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या, मॅट/चटई व्यवस्था, टेबल १०० नग, खुर्च्या ४०० नग, करीता र.रु.५०,०००/- हा खर्च स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत स्पिकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.५०,०००/- हा खर्च विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.१,८३,४५०/- क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने ट्रॉफीज, सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे, निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्रे, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, इ. खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६२ विषय क्रमांक - १८

दिनांक - ०७/०१/२०१५

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.शुभांगी लोंढे

संदर्भ : मा.सविता साळुंके, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल असोसिएशन, पुणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन यांचे मान्यतेने माहे फेब्रुवारी/मार्च २०१५ मध्ये म्हाडा कॉलनी, लक्ष्मण रेसिडेन्सी समोर, मोरवाडी, पिंपरी ४११ ०१८ येथे महापौर चषक राज्यस्तर व्हॉलीबॉल स्पर्धा २०१५ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्च र.रु.१०,३०,०००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता तसेच मैदान तयार करणे, स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था, खेळाडूंसाठी गाद्या, उशा, चादरी, बादल्या खर्च र.रु.३,०४,०००/- हा खर्च स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत स्पिकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.१,००,०००/- हा खर्च विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.६,२६,०००/- क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने ट्रॉफीज, सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे, निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्रे, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, टोप्या इ. खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६३ विषय क्रमांक - १९

दिनांक - ०७/०१/२०१५

सुचक - मा.गिता मंचरकर अनुमोदक - मा.शुभांगी लोंढे

संदर्भ : मा.गिता मंचरकर, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने शालेय विद्यार्थ्यांचा ताणतणाव कमी करणे, विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, लवचिकपणा, निरोगी जीवनासाठी योगासने व सुर्यनमस्काराचे माध्यमातून सर्वांगीण विकास करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना शिस्त लागावी, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी रविवार दि.२५ जानेवारी २०१५ रोजी चिंचवड येथिल मोरया गोसावी क्रीडांगण, केशवनगर येथे सुर्यनमस्काराचे आयोजन करणेकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे

येणा-या अंदाजे र.रु.५,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६४ विषय क्रमांक - २०

दिनांक - ०७/०१/२०१५

सुचक - मा.शुभांगी लोंढे अनुमोदक - मा.गिता मंचरकर

संदर्भ : मा.शुभांगी लोंढे, मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड स्विमिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने महापौर चषक स्पर्धा फेब्रुवारी २०१४ मध्ये घेणेत आल्या होत्या. त्यानुसार सन २०१५ मध्ये महापौर चषक जलतरण स्पर्धा २०१५ महानगरपालिका व पिंपरी चिंचवड स्विमिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये आयोजन करणेकामी येणा-या र.रु.४,७१,५००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६५ विषय क्रमांक - २१

दिनांक - ०७/०१/२०१५

सुचक - मा.शुभांगी लोंढे अनुमोदक - मा.गिता मंचरकर

संदर्भ : मा.शुभांगी लोंढे, मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील विविध खेळांच्या होतकरु खेळाडूंना त्यांच्या खेळाचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे व त्या खेळामध्ये त्यांचा अधिकाधिक विकास व्हावा या दृष्टीकोनातून विविध खेळांचे महापौर चषक या नावाने दरवर्षी स्पर्धा भरविल्या जातात. त्यानुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने व जिल्हा खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने खो-खो खेळाचे महापौर चषक स्पर्धा प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथील बहिरवाडे क्रीडांगणावर आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६६ विषय क्रमांक - २२

दिनांक - ०७/०१/२०१५

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.गिता मंचरकर

संदर्भ : मा.सविता साळुंके, मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२३ केशवनगरमध्ये मा.आयुक्तांचा पाहणी दौरा झाला व त्या पाहणी दौ-या दरम्यान मोरया गोसावी क्रीडांगणाची दुरुस्ती बाबत आयुक्तांनी खालील सुचना केल्या

१) क्रिडांगणातील खडे, मोठे दगड काढणे व लाल माती टाकून क्रिडांगण तयार करणे, २) क्रिडांगणामध्ये असणा-या स्टेजला पत्राचे शेड मारणे, ३) वॉकींग ट्रॅकच्या बाजून लोखंडी जाळी (चेनलिंग) बसवून देणे, ४) कबड्डीचे क्रिडांगण बनवून देणे, ५) सिंगलबार, डबलबार बसविणे, ६) लांबउडी (लाँग जम्प) साठी पिच तयार करणे इ.ची अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६७ विषय क्रमांक - २३

दिनांक - ०७/०१/२०१५

सुचक - मा.गिता मंचरकर अनुमोदक - मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.गिता मंचरकर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव -

सांगवी येथील स.नं.८१ व ८२ वरील प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान यासाठी आरक्षण क्र.३३८ आहे. सदर ठिकाणी स.नं.८१ वर निवासी घरे अस्तित्वात आहेत, तर स.नं.८२ रिकामा आहे. सदर ठिकाणापासून १ कि.मी.अंतरावर सांगवी शाळा व औंध उरो रुग्णालयाची शाळा आहे. उपरोक्त स.नं. ८१ व ८२ वरील आरक्षण क्रमांक ३३८ बाबत योग्य तो निर्णय मा.क्रीडा समिती सभेत घेणे व मंजूर ठरावाप्रमाणे नगररचना विभागाकडील नस्तीवर अभिप्राय देणे आवश्यक आहे. त्यासाठी तसेच मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५६९० दिनांक ३१/१२/२००५ प्रमाणे स.नं.८१ मधील आरक्षित जागेवरील निवासी घरांचा भाग वगळून उर्वरित भाग संरक्षित करण्यास मा.महापालिका सभेने मान्यता दिलेली आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता स.नं.८१ मधील निवासी भाग वगळून उर्वरित स.नं.८२ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदानासाठी संरक्षित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६८ विषय क्रमांक - २४

दिनांक - ०७/०१/२०१५

सुचक - मा.गिता मंचरकर अनुमोदक - मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.गिता मंचरकर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड मनपाच्यावतीने नवी सांगवी बॅडमिंटन हॉल चालविला जातो. सदर बॅडमिंटन हॉल राजश्री छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक सामाजिक वैद्यकीय प्रतिष्ठान, नवी सांगवी, पुणे ४११ ०२७ ही संस्था ११ महिने भाडे कराराने चालविणेस घेणेस इच्छुक आहे. तरी मनपाचा नवी सांगवी बॅडमिंटन हॉल हा राजश्री छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक सामाजिक वैद्यकीय प्रतिष्ठान, नवी सांगवी, पुणे ४११ ०२७ या संस्थेकडून योग्य ते भाडे आकारुन ११ महिने भाडे कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( ननवरे जितेंद्र बाबा )**
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ २२ /२०१५
दिनांक : १४/०१/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Krida-14-15\proceeding1_Krida 9.doc